# बुध्दं शरणं गच्छामि - भाग २

**दि. ६ नोव्हेंबर - दिवस तिसरा (मागच्या भागावरून पुढे चालू)**

नालंदा विद्यापीठ पाहिल्यानंतर जेवण करून आम्ही वेणूवन (बांबू फॉरेस्ट) आणि गृध्रकूट पर्वत (Vulture's Beak Mountain) पाहिले.


वेणूवन-



जेव्हा सिद्धार्थ घर सोडून गेला तेव्हा त्याचे वडील राजा शुध्दोदन ह्याने सगळ्या राजांना निरोप पाठवला की सिध्दार्थला शोधा. राजगीरचा राजा बिंबिसार हा शुद्धोदनाच्या जवळचा होता. म्हणून

त्याने सिध्दार्थला शोधण्याचे खूप प्रयत्न केले. तेव्हा त्याला समजले की एक राजबिंडा साधू गृध्रकूट पर्वतावर तप करत आहे. तो त्याला भेटला आणि सिध्दार्थला ओळखले. त्याने पुन्हा राजवाड्यात जाण्यासाठी सिध्दार्थचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सिध्दार्थनेच त्याला पटवून दिले की तो ज्या उद्‌देशाने बाहेर पडला आहे तो राज्य चालवण्यापेक्षा जास्त महत्वाचा आहे. तेव्हा बिंबिसार त्याला म्हणाला की जर तुझा उद्‌देश सफल झाला तर मला तू उपदेश कर. त्यानंतर जेव्हा ज्ञानप्राप्ती होऊन गौतम बुध्द परत आला तेव्हा त्याने बिंबिसार राजाला शिकवण दिली. बिंबिसार राजाने वेणूवन हे बांबूचे वन बुध्दाला दान दिले. हे बुध्दाला मिळालेले पहिले दान. सारीपुत्र आणि मौदगलायन हे जवळच राहत होते. तेही बुध्दाचे शिष्य झाले. सारीपुत्राला बुध्दाने धर्मसेनापती हे पद दिले. त्यानेच नालंदा युनिव्हर्सिटी स्थापन केली.

गृध्रकूट पर्वत (Vulture Beak Mountain)



राजगीरजवळ हा पर्वत आहे. ह्याच्यावर असलेले दगड आणि गुहा गिधाडाच्या चोचीच्या आकाराचे आहेत. म्हणून हे नाव दिले आहे. बुध्द ज्ञानप्राप्तीआधी आणि नंतरही इथे बराच काळ वास्तव्य करत

असे. सर्वात वर असलेल्या गुहेतून तो डोंगर उतरून जरा खाली असलेल्या गुहेत जात असे. आनंदा आणि सारीपुत्र हे त्याचे शिष्य त्या गुहेत राहत असत.



गिधाडे ही मृतदेह खातात. बुध्द ह्यातून संदेश देतो की तुम्ही जिवंत असताना कोणीही असा, मृत्यूनंतर गिधाडांचे भक्ष्य होणार आहात. म्हणून कोणत्याही भौतिक गोष्टीत गुंतू नका. फक्त आपले कर्तव्य करा.

ह्या पर्वताजवळच बिंबिसार जेल आहे. बिंबिसार राजाचा मुलगा अजातशत्रू ह्याने बिंबिसार राजाला तुरुंगात टाकले होते. तेव्हा त्या तुरुंगातून तो ह्या पर्वताकडे बघत असे. बुध्दाला भेटल्याचा अनुभव त्याला मिळत असे.

**दि. ७ नोव्हेंबर - दिवस ४ था**




ट्रेन ४ वाजताच बनारसला पोचली होती. आम्ही ८.३० वाजता बसने निघून सारनाथ येथे गेलो. सारनाथ हे ही बुध्दाच्या जीवनातील महत्त्वाचे स्थान आहे. जेव्हा सिध्दार्थने सुजाताकडून खीर घेतली तेव्हा तेथील श्रमणांनी त्याच्यावर खूप टीका केली. त्याचे पाच मित्रही त्याला सोडून गेले.

ज्ञानप्राप्तीनंतर गौतम बुध्द ४९ दिवस त्या आनंदात डुंबत बोधगयेमध्येच राहिला. पण त्यानंतर त्याने त्या पाच मित्रांचा शोध घेतला. तेव्हा ते सारनाथ येथे आहेत हे त्याला समजले. मग तो पायी चालत तेथे आला. (ज्या ठिकाणी ते पाच मित्र भेटले तेथे आता पंचायतन मंदिर आहे.) बुध्दाचा चेहरा इतका तेजःपुंज दिसत होता की त्यांना लगेच पटले की हयाला ज्ञानप्राप्ती झाली आहे. ते त्याचे अनुयायी झाले. त्यांना त्याने प्रवचन दिले. (1st sermon) तसेच त्यांच्या बरोबर भिक्षुसंघ स्थापन केला.



त्या जागेबर धर्मचक्रप्रवर्तन स्तूप बुद्धाच्या मृत्यूनंतर बांधला गेला. तेव्हा छोटा होता. नंतर अशोकाने मोठा स्तूप बांधला. परंतु ११९९ मध्ये हा सर्व परिसर जाळला गेला. त्यानंतर १९ व्या शतकात उत्खनन होऊन हयाचे अवशेष सापडले. आता ह्या स्तूपाला धम्मेक स्तूप असे म्हणतात. ह्या परिसराला ऋषिपत्तन मृगदा असे नाव होते. म्हणजे ऋषि आणि सर्व जीवांचे राहण्याचे ठिकाण.

उत्खननानंतर ह्या परिसरात सापडलेल्या इमारती :


मूलगंध कुटी विहार - बुध्द जेव्हा सारनाथला येई, तेव्हा ह्या ठिकाणी राहत असे. त्याच्याजवळ पंचायतन मंदिर, अशोकस्तंभ हेही होते. अशोकस्तंभाचे पाच तुकडे झाले आहेत. ते ५ तुकडे त्या

ठिकाणीच आहेत. भारताची राजमुद्रा असलेले चार सिंह असलेले स्तंभशीर्ष आता जवळच असलेल्या म्युझियममध्ये आहे. त्याजवळ धम्मेक स्तूप आणि मधल्या जागेत अनेक Votive स्तूप आहेत. ते त्यात एक व्यक्ती बसून ध्यान करू शकेल एवढे आकाराने आहेत. (आता फक्त पाया शिल्लक आहे).



मृगवन - बाजूला खूप हरणे असलेले मृगवन आहे.

धर्मराजिक स्तूप - हा मोठा गोलाकार स्तूप आहे. ह्याचाही पाया आणि प्रदक्षिणा मार्ग फक्त शिल्लक आहे. बुध्दाच्या मृत्यूनंतर त्याच्या अस्थी आणि राखेचे ८ भाग करून आठ स्तूप बांधले होते. अशोकाने त्यापैकी ७ शारीरिक अवशेषांचे ८४,००० तुकडे केले आणि त्यावर स्तूप उभारले. धर्मराजिक स्तूप हा असाच स्तूप आहे. उत्खननात ते अवशेष सापडले, पण काशीला तोपर्यंत हिंदू राजा मिळाला होता आणि त्याने हिंदू प्रथेप्रमाणे ते अवशेष गंगेत विसर्जित केले. ह्या सर्व इमारती विटांनी बांधल्या आहेत. त्यांना बाहेरून कोरीव काम केलेल्या दगडांनी सुशोभित केले होते. मात्र आता थोडेच दगड जागेवर आहेत. असे खूप दगड उत्खननात मिळाले. ते म्युझियममध्ये ठेवले आहेत.




म्युझियम - म्युझियममध्ये जाताना मोबाइलसकट बॅग सुध्दा बाहेर ठेवून जावे लागले. त्यामुळे फोटो काढता आले नाहीत. अनेक बुध्दमूर्ती, बोधिसत्व, तारा, अनेक बुध्दिस्ट देवता, तसेच काही हिंदू देवतांची शिल्पे सुध्दा आहेत. बुध्दाच्या जीवनातील प्रसंगही कोरलेले दगड आहेत. हे भिंती सुशोभित करायला वापरलेले दगड आहेत. दगडाचा एक भाग सपाट असतो. तो भिंतीला चिकटवला जायचा. (विटांची पूड, चुनखडी आणि स्ट्रॉ ह्यांच्या मिश्रणाने)

नवीन मूलगंध कुटीविहार - उत्खनन विभागाच्या नियमनानुसार जुना कुटीविहार आहे तसाच ठेवायचा आहे म्हणून ह्या परिसरातच आता नवीन मूलगंध कुटीविहार बांधला आहे. त्यात बुध्दमूर्ती आहे. पण हे पूर्ण आधुनिक बांधकाम आहे.

**दि. ८ नोव्हेंबर - दिवस पाचवा**

ठरलेल्या प्लॅनप्रमाणे ट्रेनमधून ७ वाजता नौतन्चा रेल्वे स्टेशनला जाऊन तिथून लगेच बसने नेपाळला जाणार होतो. पण ट्रेन लेट होऊन १० वाजता आम्ही बसमधून निघालो. इंडो नेपाळ बॉर्डरवर एकदा भारताच्या बाजूला आणि एकदा नेपाळच्या बाजूला इमिग्रेशनच्या फॉर्मेलिटीज पूर्ण करून आम्ही दुपारी २ वाजता हॉटेलमध्ये पोचलो. जेवून, विश्रांती घेऊन साडेतीन वाजता लुम्बीनीला जायला निघालो.



परिसरात असलेले दोन नवीन साल वृक्ष

लुम्बीनी हे गौतम बुध्दाचे जन्मस्थान. नेपाळच्या प्रथेप्रमाणे गौतम बुध्दाची आई महामाया ही सासरहून माहेरी जाण्यासाठी निघाली, कारण पहिल्या बाळाच्या जन्मासाठी स्त्रिया माहेरी जातात. वाटेत रुमिनदेई (देवी) ह्या देवीच्या दर्शनासाठी थांबली. पण तेव्हाच तिला कळा सुरू होऊन सिध्दार्थचा जन्म झाला. जन्माच्या ठिकाणी दोन साल वृक्ष होते. त्यांच्या फांदीला तिने धरले होते.

रुमिन देवीचे स्थान ह्या जागेच्या समोरच आहे. तसेच तिथल्या प्रथेप्रमाणे मुलाच्या जन्मानंतर महामायेने तलावात स्नान केले. तो तलावही तिथेच आहे.



ह्या परिसरात अशोकाने एक मंदिर बांधले होते. साल वृक्षांच्या जागी एक इमारत होती. हा सर्व परिसर देखील आक्रमकांकडून नष्ट करण्यात आला. नेपाळ सरकारने उत्खनन केले तेव्हा खालील गोष्टी सापडल्या :

जुन्या महामाया मंदिराचे अवशेष - हे सापडले तसेच ठेवले आहेत.



नवीन महामाया मंदिर- साल वृक्षांच्या जागी जी इमारत होती तेथे आता नवीन महामाया मंदिर आहे. (साल वृक्ष आता तेथे नाहीत पण परिसरात असलेले दोन साल वृक्ष आम्ही पाहिले).




मधल्या जागेत खूप vorive स्तूप आणि विहारांचे अवशेष आहेत.

रुमिनदेई - पिंपळाच्या खोडाजवळ देवी आहे. तिला अजूनही निरांजन - उदबत्ती लावतात.



अशोकस्तंभ - नवीन मंदिराजवळ अशोकस्तंभ आहे. त्यावर बैलाचे शीर्ष होते पण ते आता नाहीये. ह्या स्तंभावरील कोरलेल्या लेखात असे लिहिले आहे की हे बुध्दाचे जन्मस्थान असल्यामुळे राजा अशोक त्यांचे कर अर्धे करत आहे. मंदिराच्या मागेही काही votive स्तूप आहेत. सर्व बांधकाम विटा आणि काही ठिकाणी दगडांचे आहे.



अशोकस्तंभावर कोरलेला लेख

(क्रमश:)

**- डॉ. मंजिरी मणेरीकर**